दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे | अंक -२८९ | रविवार,दि.२२ जुन २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-289 | Sunday, Dt.22 June 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# सर्व शाळांसाठी नवीन वेळापत्रक लागू !

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी सुधारित वेळापत्रक जाहीर, शासनाचा जीआर प्रसिद्ध!

**प्रतिनिधी @ बीड**

महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून नवीन वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. कारण राज्यात आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. यावर्षीपासून या नव्या धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी होणार असून, त्यानुसार नव्या वेळापत्रकाचीही अंमलबजावणी करण्यात येणार आहे.राज्यातील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. सध्याच्या स्थितीनुसार, ५ ऑक्टोबर २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी विषयानुसार तासिकांची विभागणी लागू आहे.

मात्र, १६ एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची (न्यू एज्युकेशन पॉलिसी) अंमलबजावणी केली जाणार आहे. हे नवीन धोरण शालेय विद्यार्थ्यांसाठी यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच लागू होणार असून, त्यानुसार तासिका आणि अभ्यासक्रमाच्या रचनेत बदल केले जाणार आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नवीन शैक्षणिक धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू करण्यात येणार आहे. यावर्षी केवळ इयत्ता पहिलीसाठी हे नवे धोरण लागू होणार आहे. त्यानुसार पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नव्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी देखील यंदाच्या वर्षीपासून केली जाणार आहे.

या नव्या धोरणानुसार पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित शालेय वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने सर्व माध्यमांच्या शाळांसाठी इयत्ता पहिली व दुसरीसाठी हे सुधारित वेळापत्रक लागू करण्यात आले आहे.शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १८ जून २०२५ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार, नव्या शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्यात आलेले सुधारित वेळापत्रक लागू करण्यात आले आहे. या वेळापत्रकात विषयवार तासिकांची स्पष्ट विभागणी करण्यात आली असून, नवीन अभ्यासक्रमाला अनुसरून ते रचण्यात आले आहे.

नवीन वेळापत्रकानुसार, संपूर्ण शालेय वर्षात एकूण ३६५ दिवसांपैकी २१० दिवस हे अध्ययन-अध्यापनासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यासाठी ३५ आठवड्यांचा अभ्यासकाल निश्चित करण्यात आला आहे. उर्वरित दिवसांमध्ये परीक्षा, मूल्यांकन आणि सहशालेय उपक्रम राबवले जाणार आहेत.

त्यामध्ये परीक्षा व अनुषंगिक कृतीसाठी १४ दिवस, सहशालेय उपक्रमांसाठी १३ दिवस, आणि रविवार व इतर सुट्ट्यांसह एकूण १२८ दिवस सुट्टीचे नियोजन करण्यात आले आहे. शाळांचा अध्यापन कालावधी सर्व शाळांसाठी एकसमान ठेवण्यात आला असून, परिपाठ, मधली सुट्टी आणि समृद्धीकरण तासिकांमध्ये



वेळेच्या उपलब्धतेनुसार थोडाफार फरक असू शकतो, असे शासनाने स्पष्ट केले आहे.या नव्या वेळापत्रकात गणित, पर्यावरण, भाषा, आरोग्य शिक्षण व कलाशिक्षण यांसारख्या विषयांना समप्रमाणात वेळ देण्यात आला आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल.सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये एकसंध अभ्यास आराखडा लागू करण्याचा उद्देश या वेळापत्रकामागे असून, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाचा समतोल राखण्यास मदत होईल. शालेय जीवन अधिक गुणवत्तापूर्ण आणि शिस्तबद्ध व्हावे, या उद्देशानेच हा निर्णय घेण्यात आल्याचे शालेय शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त राजू वंजारे यांच्यासह टीमचे पत्रकार संघाने केले अभिनंदन..!



**प्रतिनिधी @ बीड**

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सन्मानाचा मानांकित पुरस्कार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हा बीड तालुक्यातील येळंब (घाट) येथील निसर्ग फाउंडेशन या संस्थेला सामाजिक कार्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यासह सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते मिळाल्याने बीड जिल्ह्याची शान आणि मान या संस्थेचे प्रमुख राजू वंजारे यांनी वाढवल्याबद्दल त्यांचा आणि त्यांच्या टीमचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्हा शाखेने शाल, पुष्पहार, पुष्पगुच्छ, वृक्ष भेट देऊन अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे शनिवार दिनांक २१ जून २०२५ रोजी जागतिक योग दिनाचे औचित्य साधून पत्रकार संघाच्या वतीने बीड जिल्ह्याचे सामाजिक कार्यातून राज्यामध्ये उंची वाढवून सन्मानाचा पुरस्कार साहित्यरत्न लोकशाहीर

(उर्वरीत पान २ वर)

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हास्तरीय अधिवेशन १७ सप्टेंबरला होणार - वैभव स्वामी

## बीड येथील शासकीय विश्रामगृहात जिल्हास्तरीय बैठक उत्साहात संपन्न





**प्रतिनिधी @ बीड**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे मराठवाडा विभागीय अधिवेशन नुकतेच ऐतिहासिक आणि यशस्वीरित्या संपन्न झाले.आता येणाऱ्या १७ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये बीडचे पहिले जिल्हास्तरीय अधिवेशन २०२५ मध्ये घेण्याचे जिल्हास्तरीय बैठकीमध्ये निश्चित झाल्याचे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी जाहीर केले आहे.

बीड येथील शासकीय

(उर्वरीत पान २ वर)

### पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष यांच्यासह राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांची मंदियाळी...

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संस्थापक संजय भोकरे साहेब यांच्यासह पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश समन्वयक नितीन शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमानी, प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांच्यासह मुंबई, दिल्ली, पुणे येथील वृत्तवाहिनी, विविध मानांकित दैनिकांचे पत्रकार, संपादक यांना विशेष निमंत्रित करण्यात येणार असून त्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हास्तरीय अधिवेशन संपन्न होणार असल्याने बीडचे हे पहिले अधिवेशन ऐतिहासिक ठरण्याची शक्यता आहे.

# माजी आ.भीमराव धोंडे यांच्या शेतात बिबट्यांचा मुक्काम

## परिसरात भीतीचे वातावरण

**प्रतिनिधी @ आष्टी**

आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या शेतामध्ये गेल्या आठ दिवसापासून बिबट्या आणि दोन पिल्लांच्या सह सतत दिसत असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या बिबट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

माजी आमदार भीमराव धोंडे यांचे आष्टी तालुक्यातील चोभानिमगाव येथे शेती क्षेत्र आहे. या शेतीमध्ये गेल्या आठ दिवसापासून माती जातीचा बिबट्या आणि त्याचे दोन पिल्ले शेतकरी ग्रामस्थांच्या दृष्टीस पडत आहेत. अनेक दिवसापासून त्यांचा मुक्कामी या शेतीत असल्याचे शेतकरी सांगतात. दरम्यान, या परिसरामध्ये शेळ्या, वासरे यांनाही फस्त केल्याच्या घटना झाल्या आहेत. या बिबट्याचे दर्शन झालेल्या व्यक्तींमध्ये भीती निर्माण झाली

(उर्वरीत पान २ वर)

# वाळू वाहतूक करणारा टॅक्टर पकडला



**प्रतिनिधी @ गेवराई**

चकलांबा पोलीस ठाणे हद्दीतील सुरळेगावमध्ये चोरट्या मार्गाने एक टॅक्टर वाळू वाहतूक करणारा असल्याची माहिती मिळाल्यावरून सपोनि संदीप पाटील यांनी आपल्या अंमलदार यांना सूचना करून नदीपात्रात दबा धरून बसण्याच्या सूचना केल्या होत्या.त्यानुसार टॅक्टर पात्रता वाळू काढण्यासाठी आला असता दोन अंमलदार यांनी त्या टॅक्टर चालकाला ताब्यात घेत

(उर्वरीत पान २ वर)

॥ दशक्रिया विधी ॥



आपले,
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, यांचे धाकटे बंधू महानुभाव पंथांचे उपासक आणि संत साहित्याचे अभ्यासक प्रवरशास्त्री यांचे दि.१३ जून २०२५ रोजी अकाली दुःखद निधन झाले.त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी यासाठी रविवारी, दिनांक २२ जून २०२५ रोजी, महानुभाव आश्रम आरवाडा बाळापूर बसस्टँड जवळ, ता. कळमनुरी जिल्हा हिंगोली येथे सकाळी १० वाजल्या पासून दशक्रिया विधीचे आयोजन करण्यात आले आहे. वाकडे कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे...
महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे आणि त्यांच्या परिवारावर कोसळलेल्या दुःखात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.
शोकाकुल
वैभव स्वामी
प्रदेश संपर्कप्रमुख, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई
तथा संपादक दैनिक समर्थ राजयोग.

# पाटोद्यात बोगस सोयाबीन बियाणे



शेतकऱ्यांचे हजारोंचे नुकसान गंभीर प्रकरणाची चौकशी करून कारवाई करा - शेतकरी कैलास गर्जे यांची मागणी

**प्रतिनिधी @ पाटोदा**

पाटोदा तालुक्यातील महासांगवी येथील शेतकरी कैलास विलास गर्जे यांनी अडीच एकर क्षेत्रात पेरलेले बूस्टर सोयाबीन वाणाचे बियाणे हे बोगस असल्याचे स्पष्ट झाले असून, त्याचा पेरा उगवलाच नाही. या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, संपूर्ण तालुक्यात यामुळे खळबळ माजली आहे. गर्जे यांनी दिनांक २८ मे २०२५ रोजी पाटोदा शहरातील रामेश्वर कृषी ॲग्रो सर्व्हिसेस येथून सोयाबीनचे बियाणे खरेदी करून आपल्या घोलप वस्ती येथील शेतात पेरणी केली होती.मात्र नियोजित कालावधीत पीक उगवलेच नाही. त्यामुळे अन्नदात्याचे संपूर्ण मेहनतीचे व आर्थिक गुंतवणुकीचे नुकसान झाले आहे.यामुळे

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# एकनाथ शिंदे आक्रमक, उबाठा सेना हतबल

शिवसेना पक्षाचा मेळावा मुंबईत संपन्न झाला. यापूर्वी शिवसेना पक्षाचा १९ जून रोजी एकच मेळावा व्हायचा. पण एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या सर्वाधिक आमदारांनी, खासदारांनी, माजी नगरसेवकांनी, पक्षीय पदाधिकाऱ्यांनी उद्धव ठाकरेंच्या अरेरावीला, एककल्ली कारभाराला व सत्तेसाठी हिंदुत्वाला बासनात गुंडाळत काँग्रेसशी युती केल्याच्या निर्णयाचा संताप व्यक्त करत वेगळी राजकीय चूल मांडली. निवडणूक आयोगानेही लोकप्रतिनिधी व पक्षीय पदाधिकाऱ्यांच्या संख्याबळाकडे पाहता एकनाथ शिंदेंची शिवसेना खरी शिवसेना असल्याचा निकाल देत शिवसेना व शिवसेनेचे निवडणूक चिन्ह असलेले धनुष्यबाण एकनाथ शिंदेंच्या स्वाधीन केले. सत्तेसाठी हिंदुत्वाच्या ध्येयधोरणाला तिलांजली देत काँग्रेसशी मांडीला मांडी लावल्याने उद्धव ठाकरे यांना पक्षाचे नाव व निवडणूक चिन्ह गमवावे लागले आणि अखेरीला त्यांना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या नव्या नावाने मशाल निवडणूक चिन्हाच्या मदतीने राजकीय वाटचाल करण्याची वेळ आली. एकाच नावसाधर्म्य असलेल्या दोन संघटनांचे मेळावे एकाच दिवशी मुंबईत साजरे झाले. अर्थात वैचारिक मतभेद, राजकीय वाद म्हटल्यावर दोन्ही संघटनांच्या प्रमुखांकडून एकमेकांकडून आरोप-प्रत्यारोप, राजकीय चिखलफेक होणे स्वाभाविकच आहे. याही वेळी दोन्ही संघटनांच्या मेळाव्यामध्ये हाच प्रकार झाला. पक्षाच्या स्थापना दिनाचा मेळावा म्हटल्यावर पक्षाची पार्श्वभूमी, पक्षाची आजवरची वाटचाल, आगामी ध्येयधोरणे यावर विचारविनियम होऊन पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना मार्गदर्शन होणे आवश्यक होते. पण उद्धव ठाकरेंनी आपल्या भाषणामध्ये तोच संवादाचा प्रकार कायम ठेवल्याने उबाठा सेनेच्या सैनिकांना नेहमीप्रमाणे याही मेळाव्यात विचारांची दिशा मिळालीच नाही. माझा बाप चोरला, पक्ष चोरला, निवडणूक चिन्ह चोरले या पलीकडे उद्धव ठाकरेंना पक्षफुटीनंतर विशेष काहीही बोलता आले नाही; परंतु त्यांनी राणा भीमदेवी थाटाचा आवेश निर्माण करत अंगी नसलेले शौर्य दाखविण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. उद्धव ठाकरे यांच्या आरोपाचा थेट पंचनामा करत शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांनी सर्व चिरफाड करत उबाठांचे वस्त्रहरणच केले आहे. उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणातून 'किल मी' आणि 'मला मारायला येताना रुग्णवाहिका घेऊन या, त्याच रुग्णवाहिकेतून परत पाठविले जाईल' असा इशारा दिला होता. एकनाथ शिंदेंनी ठाकरेंच्या या आरोपाला उत्तर देताना आधीच मेलेल्यांना कोण परत मारणार? विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील मतदारांनी आधीच उबाठाला संपविले आहे. ज्या माणसाला आपल्या पक्षातील फूट थांबविता आली नाही, लोकप्रतिनिधींना तसेच पक्षीय पदाधिकाऱ्यांना पक्षातून बाहेर जाताना थांबविणे शक्य झाले नाही, आजही उबाठा सेनेमध्ये मोठ्या प्रमाणावर गळती सुरूच आहे. ही गळती थांबविणे उबाठा सेनाप्रमुखांना शक्य झाले नाही, त्यांनी रुग्णवाहिकेची भाषा बोलावे, याची एकनाथ शिंदेंनी खिल्ली उडविताना ठाकरेंना त्यांच्या राजकीय ताकदीची जाणीव करून दिली आहे.

वर्धापन दिन कार्यक्रमात शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना पुण्यात घडलेल्या वैष्णवी प्रकरणावरही एकनाथ शिंदेंनी भाष्य करताना घरातील महिलांच्या मान-सन्मानाबद्दल, त्यांच्या रक्षणाबद्दल निर्देश दिले. घरातील सुनांच्या रक्षणाबाबतचा संदेश देताना शिवसेनेच्या ५९ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिवसेनेच्या नव्या अभियानाची सुरुवात करण्यात आली. हुंडाविरोधी अभियान शिवसेनेने सुरू केले असून याच्या लोगोचे उद्घाटनही या कार्यक्रमात करण्यात आले. महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून हुंडाबळीच्या अनेक घटना पाहायला मिळाल्या आहेत. यामध्ये राजकीय पार्श्वभूमी असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या घरातही सुनांचा छळ झाल्याने त्यांनीही आत्महत्या केल्याच्या घटनांनी महाराष्ट्राच्या पुरोगामीपणाची मान शरमेने खाली गेली आहे. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने नव्या अभियानाची घोषणा केली. हुंडाबळीची वाढती प्रकरणे मराठी संस्कृतीला बट्टा लावत आहे, हे वेळीच थांबवणे गरजेचे आहे. यासाठीच पुन्हा एकदा शिवसेना सज्ज झाली आहे. जिथे घरातील सुनेचा हुड्यांसाठी छळ केला जाईल, तिथे शिवसेना या घरातल्यांची त्यांना समजेल अशा भाषेत समजूत काढेल. शिवसेनेच्या वाघिणी या पुढाकार घेतील, शिवसेना महिला आघाडी आता सज्ज झाली आहे. महाराष्ट्रातील मुलींच्या, सुनांच्या रक्षणासाठी हुंडामुक्त महाराष्ट्रासाठी 'लाडक्या सुनेचे रक्षण, हेच आहे शिवसेनेचे वचन' हे अभियान सुरू केले. पुण्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणामुळे जनतेमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला होता. तसेच महाराष्ट्रातील विविध भागांत हुंडाबळीच्या घटना समोर आल्या. याच पार्श्वभूमीवर आता शिवसेनेने हुंडाविरोधात काम करण्यासाठी नवा कार्यक्रम महिला आघाडीला दिला आहे.

## विलंब जन्म नोंदणी जाहीर प्रगटन

**मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शिरूर का. यांच्या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये दाखल प्रकरणात जन्म नोंद घेणे बाबत**

ज्या अर्थी अर्जदार राम लक्ष्मण काकडे, रा. फुलसांगवी, ता. शिरूर कासार, जि.बीड यांनी स्वतः ची मुलगी नामे काकडे रूपा राम हिचा जन्म दि. ०३/०६/२००३ रोजी फुलसांगवी, ता. शिरूर कासार, जि.बीड येथे झाल्याचा विलंब जन्म नोंदणी आदेश मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जन्म दिनांका बाबत कोणास आक्षेप असल्यास सदर आक्षेप स्वतः किंवा आपले वकिला मार्फत हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसात नोंदवावा. अन्यथा कोणाचाही काही आक्षेप नाही असे समजून अर्जाची सुनावणी घेउन विलंबाने जन्म नोंद घेणे बाबत आदेश केला जाईल.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी शिरूर कासार

# श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचा २१ वा वर्धापन दिन व जागतिक योग दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचा २१ वा वर्धापन दिन  तसेच जागतिक योग दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेने दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. सन २००४  मध्ये श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना झाली. संस्थेच्या अंतर्गत विविध शैक्षणिक उपक्रम प्रभावीपणे राबवले जात आहेत. अंबाजोगाई परिसरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि आधुनिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली न्यू व्हिजन पब्लिक स्कूल ही शाळा आज एका विशाल वटवृक्षासारखी बहरलेली आहे. या शाळेत विद्यार्थ्यांना जीवनमूल्ये, शिस्त, संस्कार, विज्ञान, तंत्रज्ञान व संगणकाचे सर्वांगीण ज्ञान दिले जाते.

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाकडून मानवविकास अपंग , मूकबधिर विद्यालय, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालय, घाट नागनाथ विद्यालय,न्यू व्हिजन पब्लिक स्कुल, अध्यापक महाविद्यालय, फार्मसी महाविद्यालय बीसीएस विद्यालय, स्वच्छता निरीक्षक महाविद्यालय यासह विविध प्रकारचे अभ्यासक्रम श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना शिकवले जातात. संस्थेच्या या अचूक व गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण होऊन गेलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात यशस्वीपणे कार्यरत आहेत. काही विद्यार्थी परदेशात उच्च शिक्षण घेत आहेत तर काही



समाजसेवेच्या माध्यमातून अंबाजोगाईचे नाव उज्वल करत आहेत. वर्धापन दिनाच्या निमित्ताने केक कापून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे आंतरराष्ट्रीय योग दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ७:०० ते ९:०० या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी आणि अतिथी यांनी सक्रिय सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी योगाचे आधुनिक जीवनातील महत्त्व विशद केले. योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून, तो आरोग्य, मानसिक शांती आणि आध्यात्मिक समृद्धीचा पाया आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख मामून खुरेशी यांनी कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करून सर्वांना योगाभ्यासासाठी प्रोत्साहित केले.

योग प्रशिक्षक अमर कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागींनी प्राणायाम कपालभाती, अनुलोम- विलोम, भ्रामरीद्वारे श्वसन नियंत्रण शिकवले. योगासने: सूर्य नमस्कार, ताडासन, भुजंगासन, धनुरासन यासारख्या आसनांचा सराव केला. १० मिनिटांच्या मौन ध्यानाने मनःशांतीचा अनुभव घेतला. विद्यार्थिनी योगामुळे तणाव कमी होतो आणि एकाग्रता वाढते याचा प्रत्यक्ष अनुभव  योग्य गुरू अमर कावरे यांच्याकडून घेतला. योगाला दैनंदिन आयुष्यात समाविष्ट करण्याचा आग्रह  देखील त्यांनी याप्रसंगी धरला.कार्यक्रमाच्या शेवटी सहभागींना सहभाग प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. प्राचार्य संतोष तरके यानी भविष्यातही अशा उपक्रमांना प्राधान्य देण्याचे  आश्वासन दिले. आजच्या योगसाधना कार्यक्रमात १२० हून अधिक योगसाधक उपस्थित होते. योगासनांबरोबरच आहार आणि आरोग्यावरील मार्गदर्शन देखील  योगगुरू अमर कावरे यांनी केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दलची जिज्ञासा वाढली आणि प्रत्येक दिन योग दिन हे संदेश विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरातील सर्वांना दिला. जागतिक योगदिन तसेच संस्थेचा २१ वा वर्धापन दिन यानिमित्ताने संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी , मार्गदर्शक बी. आय. खडकभावी, मार्गदर्शक वसंत चव्हाण, मार्गदर्शक डी. एच. थोरात, प्राचार्य एम. प्रशांत कुमार यानी उपस्थित सर्वांना शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, पालक-शिक्षक समिती व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टी येथील कन्या प्रशालेत जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा



प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी तालुक्यातीलच नव्हे तर बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद बीड ची सर्वात जास्त मुलींची पटसंख्या असलेली व मुलींना स्वरक्षणाची हमी देणारी तसेच १०० % निकालाची उज्वल परंपरा असलेली जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे शनिवार दिनांक २१ जून २०२५ रोजी जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्रमुख उपस्थिती पंचायत समिती आष्टी च्या गटशिक्षणाधिकारी श्रीम. सिमाताई काळे मँडम यांची होती. श्रीम. सिमाताई काळे यांनी प्रत्यक्ष योगामध्ये सहभागी होवून स्वतः योगासने केली. याप्रसंगी त्यांनी सर्व विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. आपल्या प्रमुख मार्गदर्शनात योगाचे जीवनात किती महत्त्व आहे याबाबत सविस्तर माहिती सांगितली तसेच देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी साहेबांचे विशेष आभार व्यक्त करुन शाळेतील विद्यार्थीनींना गुणवत्ते संदर्भात विशेष असे मार्गदर्शन केले.

सुरुवातीला योग दिनानिमित्त योग गीत घेवून सर्वांना चिंतन करायला लावले. तद्नंतर शाळेतील आदर्श क्रीडा शिक्षक संजय भोकरे यांनी काही योगाची प्रात्यक्षिके घेवून ते विद्यार्थीनीं कडून प्रत्यक्ष करवून घेतले व योग का करणे आवश्यक आहे याविषयी सखोल माहिती दिली. त्यानंतर शाळेतील जेष्ठ शिक्षक शिवाजी आव्हाड यांनी बैठे योगाचे प्रात्यक्षिके करवून घेतले व त्या प्रात्यक्षिके विषयी सविस्तर माहिती विद्यार्थीनींना दिली तसेच शाळेतील चित्रकला शिक्षिका श्रीम. कोमल थेटे यांनी काही बैठे आसने मुलींकडून करवून घेतले. यावेळी शाळेतील जेष्ठ शिक्षिका श्रीम. सुरेखा कुटे यांनी योगामध्ये चिंतन व मनन कसे करावे, मनशांती कशी असावी याबाबत मार्गदर्शन केले व काही प्रार्थना एक चित्त करुन म्हणवून घेतल्या तसेच राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड यांनी शेवटी हास्यासन घेवून मुलींना हसवून आनंददायी वातावरण तयार केले.

तद्नंतर प्रमुख उपस्थिती लाभलेल्या गटशिक्षणाधिकारी श्रीम. सिमाताई काळे मँडम यांचा प्रशालेच्या वतिने पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देवून यथोचित सन्मान करण्यात आला. शेवटी संजय भोकरे यांनी योग दिनानिमित्त विद्यार्थीनींना शपथ देवून योग दिन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

याप्रसंगी शाळेतील आदर्श शिक्षक - शिक्षिका श्रीम. सुरेखा कुटे, सुरेश नरोड, श्रीम. स्वाती टेकाडे, श्रीम. नाजिया बागवान, भोकरे संजय, विठ्ठल जगताप, श्रीम. लतिका तरटे, राजेंद्र लाड, दत्तात्रय गाडेकर, देविदास शिंदे, आप्पासाहेब काळे, श्रीम. आशा शिंदे, श्रीम. रुक्मिण करपे, शिवाजी आव्हाड, श्रीम. अश्विनी धस, श्रीम. रोहिणी कार्ले, संतोष खंडागळे, राजेंद्र शेळके, श्रीम. धोंडे मनिषा, श्रीम. धोंडे अर्चना उपस्थित होते तर सेवक धोंडे संतोष, श्रीम. जाधव सावित्रा यांनी योग दिनाच्या कार्यक्रमासाठी कठोर परिश्रम घेतले व शेवटी मुलींना अल्पपोपहार देण्यात आला.





# आंतरराष्ट्रीय योग दिनी विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांनी सजले विद्यालयाचे प्रांगण

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

आरोग्य हीच खरी संपत्ती , या उक्तीला साजेसा आणि ' योग साधना -निरोगी जीवनाची गुरुकिल्ली' हा संदेश घेऊन स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर, अंबाजोगाई येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री. संतोष दादा कुलकर्णी होते. संस्थेच्या सचिव तथा शाळेच्या मुख्याध्यापिका सौ स्वरूपाताई दिग्रसकर. प्रमुखा तिथी म्हणून योग गुरु श्री परमेश्वर होळकर सर व्यासपीठावर विराजमान होते.  शाळेच्या मुख्याध्यापिका व संस्थेच्या सचिव सौ. स्वरूपाताई दिग्रसकर यांनी प्रास्ताविक करताना आपल्या अनुभवांतून योगाचा सखोल प्रभाव विद्यार्थ्यांवर कसा पडतो हे समजावून सांगितले. व नियम पाळावे या गीताने वातावरणात प्रसन्नता आणली.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी योग गुरु श्री. परमेश्वर होळकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन, हलासन, भुजंगासन, शलभासन, यांसारखी विविध योगासने तसेच अनुलोम-विलोम व कपालभातीसारख्या प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर केली. त्यांच्या सादरीकरणाने विद्यार्थ्यांमध्ये योगाभिमुख जीवनशैलीचा दीप उजळला.

अध्यक्षीय भाषणात श्री. संतोष दादा कुलकर्णी यांनी योगाच्या प्रभावामुळे जीवनात घडलेले सकारात्मक बदल सांगताना, काही नामवंत व्यक्तींच्या उदाहरणांद्वारे विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. लहानशा चुकीने मोठं आयुष्य वाया जाऊ शकतं हे समजावताना त्यांनी व्यसनाधीनतेच्या उद्गमाचे वास्तव चित्र विद्यार्थ्यांपुढे ठेवले.  कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. उल्हास दादा रामदासी यांनी ओघवत्या भाषेत सुरेखपणे पार पाडले. श्रीमती प्रज्ञाताई महाजन यांनी अंतःकरणपूर्वक आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेचे क्रीडाशिक्षक श्री अंकुश दादा गायकवाड यांनी केले. आकर्षक फलक लेखन व रांगोळी सजावट कला शिक्षिका श्रीमती अंजली हाके व सहकारी यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे श्रम व समर्पण होते. अशा खेळीमेळीच्या वातावरणात योग दिन संपन्न झाला.

## पान १ वरून...

**महाराष्ट्र राज्य पत्रकार...**

विश्रामगृह येथे शनिवार दिनांक २१ जून २०२५ जागतिक योग दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत बीड जिल्हा शाखेची बैठक मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाली. या बैठकीस बीडचे जिल्हाध्यक्ष अमजद खान,ग्रामीण जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दीपक काळकुटे, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर यांच्यासह पत्रकार संघाचे जिल्हा सरचिटणीस शेख वसीम, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा सरचिटणीस शेख अब्दुल, महिला जिल्हा सरचिटणीस प्रा. अनुप्रिता मोरे, जिल्हा उपाध्यक्ष शेख आयुब, जिल्हा संघटक रईस खान, गेवराईचे तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे, केजचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील, माजलगावचे मार्गदर्शक सुदर्शन स्वामी, पाटोदा तालुकाध्यक्ष अजिज शेख, वडवणीचे तालुकाध्यक्ष अशोक निपटे, ग्रामीणचे जिल्हा सरचिटणीस बालासाहेब फपाळ यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्वांनुमते बीड जिल्ह्यातील पत्रकार संघाचे पहिले जिल्हास्तरीय अधिवेशन २०२५ हे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून १७ सप्टेंबर २०२५ रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले. या जिल्हास्तरीय अधिवेशनामध्ये जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार, मंत्री,तसेच माजी आमदार, माजी खासदार, माजी मंत्री त्याचबरोबर प्रशासकीय अधिकारी आणि बीड जिल्ह्यातून इतर जिल्ह्यांमध्ये नावलौकिक मिळवलेल्या सर्व क्षेत्रातील मान्यवरांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्याचे निश्चित करण्यात आले. हे अधिवेशन नेत्रदीपक आणि ऐतिहासिक करण्याबाबत सर्वांनी एक मुखाने सहमती दिली. स्नेहभोजनाने जिल्हास्तरीय बैठकीची सांगता मोठ्या आनंदी आणि उत्साही वातावरणात करण्यात आली.

अधिवेशनामध्ये पत्रकारांसह यशस्वी रत्नांचा होणार बीडचे रत्न या पुरस्काराने सन्मान...

बीड जिल्ह्यातील अकरा तालुक्यातून माध्यमातून ११, त्याचबरोबर जिल्ह्यातून १ पेपर विक्रेता, १ पेपर लाईन वाटप करणारा, त्याचबरोबर विविध क्षेत्रांमध्ये नेत्र दीपक यशस्वी भरारी घेतलेल्या रत्नांचा बीडचे रत्न म्हणून सन्मान करण्यात येणार आहे.

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ....**

अण्णासाहेब साठे निसर्ग फाउंडेशन येळंब(घाट) या संस्थेने मिळवल्याबद्दल या संस्थेचे प्रमुख राजू वंजारे यांच्यासह त्यांचे सहकारी जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, तसेच या केंद्राच्या कार्यवाहक छाया सरवदे यांचा यथोचित सन्मान पत्रकार संघाच्या जिल्हाभरातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी केला.यावेळी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान, ग्रामीण जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दीपक काळकुटे, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, जिल्हा सरचिटणीस शेख वसीम, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा सरचिटणीस शेख अब्दुल, महिला जिल्हा सरचिटणीस प्रा. अनुप्रिता मोरे, जिल्हा उपाध्यक्ष शेख आयुब, जिल्हा संघटक रईस खान, गेवराईचे तालुकाध्यक्ष अंकुश आतकरे, केजचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील, माजलगावचे मार्गदर्शक सुदर्शन स्वामी, पाटोद्याचे तालुकाध्यक्ष अजिज शेख, वडवणीचे तालुकाध्यक्ष अशोक निपटे,ग्रामीणचे जिल्हा सरचिटणीस बालासाहेब फपाळ यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते राजू वंजारे आणि त्यांच्या टीमने मागील वर्षी महाराष्ट्र शासनाचा मानांकित डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण हा पुरस्कार मिळवून बीडचे नाव उंचावले होते. पुन्हा सलग दुसऱ्या वर्षी आता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार मिळवून बीड जिल्ह्याचे नाव पुन्हा एकदा उंचावले आहे.

## पान १ वरून...

पुढील वर्षी देखील त्यांनी राज्यस्तरावरचा, केंद्रस्तरावरचा असाच सन्मानाचा पुरस्कार आपल्या चांगल्या कार्यातून मिळवावा अशा शुभेच्छा पत्रकार संघाच्या वतीने त्यांच्या सकारात्मक कार्यासाठी सर्वांनी दिल्या. स्नेहभोजनाने सत्कार सोहळ्याची सांगता मोठ्या उत्साही आणि आनंदी वातावरणात संपन्न झाली.

**वाळू वाहतूक....**

६ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी टॅक्टर चालक आरोपी - आकाश कोंडीराम भंडारे वय २२ रा. सुरळेगाव ता. गेवराई याचे विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील,पो.ह.पवार,पो.ह. राऊत यांनी केली.

**माजी आ.भीमराव..**

आहे. शेतामध्ये काम करणारे कामगार मजूर, महिला, मुले भीतीमुळे शेतीत जाण्यास धजत नाहीत. शेतातील कांदा चाळमध्ये हे बिबट्या आणि त्यांचे पिल्ले येतात. चोभा निमगाव गावच्या शेतीमध्ये हा बिबट्या आणि त्याची पिल्ले वावरत असल्याची सर्वत्र चर्चा असून या शेतीतील कांदा चाळमध्ये रात्री हा बिबट्या आणि पिल्ले आश्रयाला येतात. या संदर्भात ग्रामस्थांनी वन विभागातील कर्मचाऱ्यांना ही माहिती सांगितली आणि बिबट्याचा तुमच्या पद्धतीने बंदोबस्त करा अशी विनंती केली परंतु अद्यापर्यंत कुठलाही बंदोबस्त झाला नसल्याचे शेतकरी सांगतात. वन विभागाने याची तात्काळ दखल घेऊन दुर्दैवी प्रकार घडण्या अगोदरच यातून शेतकरी कामगार आणि शेतकऱ्यांच्या विविध जनावरे, शेळी यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत अशी मागणी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्यासह ग्रामस्थ शेतकऱ्यांनी केली आहे.

भीतीमुळे शेतकरी  शेतीत जात नाहीत गेल्या आठ दिवसापासून सातत्याने हा बिबट्या आणि त्याची दोन पिल्ले विविध शेतकरी बांधवांच्या दृष्टीस पडत असल्याने अत्यंत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कोणत्याही प्रसंगी हे संकट आपल्यावर येईल या भीतीने चोभानिमगाव येथील शेतकरी या शेती क्षेत्रात दैनंदिन शेतीमधील कामे करण्यास धजत नसल्याचे चित्र आहे.

**पाटोद्यात बोगस..**

संतप्त शेतकऱ्यांनी है बियाणे बोगस असल्याचे आरोप केले असून, यामागे कृषी दुकानदार आणि कंपनीची जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी. यासोबतच नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी कैलास गर्जे यांनी प्रशासनाकडे केली आहे. ते हेवढ्यावर न थांबता शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या कामावर ही गंभीर आरोप

या घटनेनंतर कैलास गर्जे यांनी केले कृषी विभागावर  गंभीर आरोप करत म्हटले की, तालुक्यातील अनेक कृषी दुकानदारांकडून बोगस बियाणे आणि खते खुलेआम विकले जात आहेत. मात्र पाटोदा कृषी विभागाचे अधिकारी याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे या प्रकरणामागे मिलीभगत असल्याचा संशय व्यक्त होत असुन या गंभीर प्रकरणाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी शेतकरी कैलास गर्जे यांनी केली असून या घटनेमुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांमध्येही अस्वस्थता पसरली आहे. खरीप हंगामाची सुरुवात असताना अशा प्रकारे बोगस बियाणे विकले जाणे ही अतिशय गंभीर बाब आहे. संबंधित यंत्रणांनी त्वरित चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी,अशी मागणी शेतकरी कैलास गर्जे यांनी केली आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे योगाला जागतिक पातळीवर महत्व प्राप्त झाले

## सदृढतेसाठी व्यायाम सातत्य महत्वाचे – प्रवक्ते राम कुलकर्णी

**प्रतिनिधी @ अंबाजोगाई**





योग अभ्यास ही परंपरा पुरातन काळापासून सुरू असून ऋषी-मुनींनी तर योग आधारे नवचैतन्य प्राप्त केले. सामाजिक कार्याला चालना देणारी व्यवस्था उभी राहिल्यानंतर आदर्श प्रस्थापित होतात. २०१५ पासून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी योगाला जागतिक पातळीवर महत्व प्राप्त करून दिले. स्वत:च्या शरीर सदृढतेसाठी व्यायाम योग अत्यंत महत्वाचे असुन एक रूपाया खर्च न होता असाध्य रोग पळून जातात. केवळ त्यातलं सातत्य टिकवणं महत्वाचे, कुणी करा म्हणुन करण्यापेक्षा स्वत: अंतर्मुख होवून याकडे पाहिलं तर त्याची किंमत निश्चित कळेल असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केले.

शहरातील खोलेश्वर महाविद्यालयातील क्रिडा विभागाच्या वतीने जागतिक योग दिनानिमित्त आयोजित केलेल्या शिबीर उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर योगगुरू अंबादास भटांगरे, प्राचार्य डॉ.दिपक फुलारी, क्रीडा विभागप्रमुख श्री.चव्हाण यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना कुलकर्णी म्हणाले की, रोज व्यायाम करणं ही प्रत्येकाची गरज ज्यांनी ओळखली अशी माणसं सातत्य कधीच सोडत नाहीत. धावपळीच्या युगात आत्मचैतन्य वाढवून मन:शांतीसाठी योगाचे फायदे होतात. प्रत्येक माणूस निरोगी राहण्याचा प्रयत्न करतो. मात्र कोणती ही गोष्ट स्वत: मनावर घेणे महत्वाचे वाटते. कुणी सुचवलं म्हणून करण्यापेक्षा किंवा २१ जुन योग दिनानिमित्त करण्यापेक्षा यातलं सातत्य प्रत्येकाच्या शरीर हितासाठी महत्वाचं वाटतं. ध्यानधारणा प्रत्येकाची गरज सध्याच्या काळात झाली आहे. वास्तविक पहाता योग ध्यानधारण या परंपरा पुरातन काळापासून चालत आल्या आहेत. ऋषी-महाऋषींनी यावर आधारित सदृढ जीवनावर यश मिळवले. अलीकडच्या काळात देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी तर योगाला जागतिक पातळीवर अनन्यसाधारण महत्व प्राप्त करून दिले. प्रत्येकासाठी व्यायाम ही आज काळाची गरज बनली. पण, त्याची किंमत आपल्याला कळत नाही. सध्या विविध व्याधी, आजारांनी माणूस त्रस्त असतो. उदा.रक्तदाब वाढला, मधुमेह झाला, सांधेदुखी वाढली. मग आपण बसल्या जागी वैद्यकिय क्षेत्राची भरती करीत रहातो. मात्र या सर्व रोगांवर मात बिनपैशाच्या व्यायाम, योग, ध्यान साधनेने होत असेल तर आपले डोळे का उघडत नाहीत ? असा सवाल त्यांनी केला. यामध्ये सातत्य ठेवलं तर रक्तदाब, मधुमेहासारख्या व्याधी आपल्या जवळ आल्या तरी निघून जातात. मी स्वअनुभवातून सांगतो. दिनचर्या बदलणे ही काळाची गरज असून यावर जो यश मिळवतो. तोच खर्या अर्थाने शारीरिकदृष्ट्या सक्षम होवू शकतो. संसार जीवनात कठोर परिश्रम करा. पण, योग, व्यायाम कधी सोडू नका. ध्यानधारणा किमान १५ मिनिटं करून बघा. आत्मबलाची क्षमता वाढल्याशिवाय रहाणार नाही. पण, हे सारं स्वत: ह्रदयातून केलं पाहिजे. पंतप्रधानांसारखी व्यक्ती जेव्हा असे उपक्रम हाती घेतो त्यात डोकावून पाहिल्यानंतर आपल्याला खर्या अर्थाने व्यायामाचे महत्व कळते. तरूण पिढीने उज्ज्वल भविष्यासाठी या उपक्रमाकडे वळावे आणि सातत्य टिकवावे असे आवाहन त्यांनी केले. शिक्षक, प्राध्यापक या मंडळींकडे समाजाला आदर्श देणारं व्यासपीठ म्हणून ओळखल्या जातं. त्यांनी खर्या अर्थाने जनजागृती करीत समाजाला योग अभ्यासाची प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष दिशा दिली. तर लोक अनुकरण निश्चित करणार असा दावा त्यांनी केला. यावेळी उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, प्रा.बिभीषण फड, प्रा.डॉ.रविंद्र कुंबेफळकर, आनंद पाठक आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# गणवेश खरेदीत आमला ग्रामपंचायतची अनियमितता

## सरपंच ग्रामसेवक यांचाच लागेना ताळमेळ

**प्रतिनिधी @ धारूर**

धारूर तालुक्यातील अमला ग्रामपंचायत मध्ये १५ व्या वित्त आयोगातून तब्बल लाख रुपयांचा निधी विद्यार्थ्यांच्या कपडे खरेदीच्या नावाखाली खर्च केला असल्याचं समोर येत आहे. या संदर्भात सरपंच अंकुश सोळंके यांना चौकशी केली असता त्यांनी गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना आम्ही ग्रामपंचायत फंडातून गणवेश घेतला असल्याचे सांगितलं तर ग्रामसेविका रोहिणी दळवी यांनी गावातील अंगणवाडीतील विद्यार्थ्यांना गणवेश खरेदीसाठी आम्ही तो निधी खर्च केला असल्याची माहिती सांगितली.शिक्षण विभागा कडून विद्यार्थ्यांना अधिकृत गणवेश मिळत असताना ग्रामपंचायतीने गणवेश खरेदी बाबत १५ व्या वित्त आयोगातील लाख रुपयांचा निधी कोणत्या अधिकारातून वापरला याची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे. विशेष म्हणजे शाळा सुरू होऊन आठ दिवस झालेले असताना कागदोपत्री खरेदी केलेला गणवेश अद्याप पर्यंत विद्यार्थ्यांपर्यंत ही पोहोचला नसल्याने आमला ग्रामपंचायत मध्ये सगळा बेबनाव असल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातील अमला ग्रामपंचायत चे सरपंच आणि ग्रामसेवक यांनी संगनमतने विद्यार्थ्यांच्या गणवेश खरेदीसाठी ग्रामपंचायतच्या १५ व्या वित्त आयोगाचा लाख रुपयांचा निधी खर्च केला असला तरी सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या कडे विचारणा केल्यानंतर त्यांच्या सांगण्यावरून सरपंच अंकुश सोळंके हे गावातील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी आम्ही तो गणवेश खरेदी केला असल्याचं सांगतात तर ग्रामसेविका रोहिणी दळवी या तोच निधी गावातील अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी कपडे खरेदीवर खर्च केला असल्याचा सांगत आहेत. मुळात आत्तापर्यंत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी किंवा अंगणवाडीच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कुठलाही गणवेश किंवा खरेदी केलेले कपडे प्राप्त झालेले नसल्याची माहिती ग्रामस्थांकडून दिली जात आहे. याबाबत विचारणा केली असता सरपंच आणि ग्रामसेविका यांच्याकडून उडवा उडवीची उत्तरे दिली जात आहेत. मुळात शालेय विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा ग्रामपंचायत कडून गणवेश किंवा खरेदी केलेले कपडे अद्याप पर्यंत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलेले नसल्याची माहिती जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकांनी दिली आहे.

गावातील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन आम्ही विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी केलेला आहे अशी माहिती सरपंच अंकुश सोळंके यांनी दिली तर दुसऱ्या बाजूला ग्रामसेविका रोहिणी दळवी यांनी गावात अंगणवाडीच्या लेकरांना कपडे घेण्यासाठी आम्ही तो निधी खर्च केला असल्याची माहिती सांगितली एकंदरीत ग्रामसेवक आणि सरपंच या दोघांनाच आपण तो नेमका निधी कुठे खर्च केला याबाबत सविस्तर माहिती सांगता येत नसल्याने गैरव्यवहाराचा प्रकार समोर येत आहे.

मुळात शिक्षण विभाग विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करत असताना ग्रामपंचायतला गणवेशासाठी निधी खर्च करायची आवश्यकताच नाही.तरीही जर हा प्रकार घडला असेल तर याची चौकशी करून कारवाई केली जाईल.
वैजनाथ लोखंडे



# जागतिक योग दिनानिमित्त पाटोदा येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने योगा दिवस साजरा

**प्रतिनिधी @ पाटोदा**

जागतिक योगा दिनानिमित्त पाटोदा नगरपंचायतच्या माध्यमातून योग गुरु श्री. किशोर वाल्हेकर यांच्या मार्गदर्शनाखाली संगमेश्वर मंदिर परिसरात भव्य योग शिबिर संपन्न करण्यात आले आपल्या भारताच्या प्राचीन विद्येपैंकी एक म्हणजे योग निरोगी शरीर, उत्तम आरोग्य आणि ऊर्जा प्राप्तीचा स्रोत आहे. जागतीक स्तरावर योगाचे महत्त्व पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी पटवून दिले आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकजण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहे. मात्र आपण आपल्या शरिराकडे लक्ष देणे गरजेचे असून जर आपल आयुष्य उत्तम आणि निरोगी जगायचं असेल तर प्रत्येकाने स्वतःसाठी दिवसातील एक तास नियमित व्यायाम करणे गरजेचे आहे. तसेच योग आणि उत्तम आहार हीच आपल्या निरोगी दीर्घायुष्याची गुरुकिल्ली आहे .यावेळी पाटोदा शहरातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी, शिक्षक, सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी नगरपंचायतच्या नगराध्यक्षा श्रीमती दिपालीताई राजू जाधव, नगरसेवक सुनील वाघमारे, महादेव जाधव, नुय्यम पठाण, पत्रकार महेश बेद्रे, श्री. रामेश्वर पाटील, श्री. पांडुरंग कदम, श्री. भीमा काका भवर, श्री. जितेंद्र भोसले, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष बंडूशेठ शेवाळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. सोमीनाथ कोल्हे, जय जाधव, श्री. चंद्रकांत बोबडे, श्री. स्वामी समर्थ केंद्र पाटोदा, नरेंद्रचार्य महाराज सेवा केंद्र पाटोदा, व्यापारी, डॉक्टर, शिक्षक, अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते

# ट्रॅक्टर जगतात सावळेश्वर ट्रॅक्टर्स ने ४ महिन्यात १६० ट्रॅक्टरची विक्रमी विक्री करुन महत्त्वाचा टप्पा गाठला

## ग्राहकांनी दिलेले समर्थन व दाखवलेल्या विश्वासासाठी रमेश दादा आजबे यांनी मानले आष्टी तालुक्यातील नागरिकांचे आभार

**प्रतिनिधी @ आष्टी**

ट्रॅक्टर जगतात सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी बाजारपेठेत दीर्घकाळापासून आघाडीवर असलेल्या त्यांच्या सावळेश्वर ट्रॅक्टर्स चे आष्टी शहरात १९ फेब्रुवारी शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर स्वराज ट्रॅक्टर चे भव्य शोरूमचे उद्घाटन आष्टी शहरात धोंडे पेट्रोल पंपाच्या समोर संपन्न झाले होते उद्घाटनावेळी १९ ट्रॅक्टर वितरित करून उद्घाटन केले होते.अन ४ च महिन्यात १६० ट्रॅक्टर विक्रीचा विक्रमी पल्ला गाठला आष्टी तालुक्यातील ग्राहकांनी दिलेले समर्थन व दाखवलेल्या विश्वासासाठी महत्वाच्या कामगिरी बद्दल ग्राहकांचे, शेतकऱ्यांचे,तसेच सावळेश्वर ट्रॅक्टर्स टीमचे आभार सावळेश्वर ट्रॅक्टर्स चे सर्वेसर्वा रमेश दादा आजबे यांनी नुकतेच त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया पेजवर मानले आहेत.अवघ्या ४ महिन्याच्या कालावधीत १६० ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे.ग्राहकांना बंपर ऑफर व सवलत दिल्याने पसंती मिळाली.

सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जिवनामध्ये परिवर्तन घडवून आणणे आणि त्यांचे जिवन समृद्ध करणे या उद्देशाने प्रेरित होऊन ट्रॅक्टर उद्योग जगतात २०१६ पासून पाऊल ठेवले त्यांनी आष्टी शहरात १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती च्या शुभमुहूर्तावर सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावाने स्वराज ट्रॅक्टर चे

नवीन ट्रॅक्टर शोरुमचा भव्य शुभारंभ संपन्न झाला यावेळी भव्य बफर ऑफर ठेवल्याने तात्काळ बुकींग करणा-यास सवलत देण्यात आल्याने अवघ्या ४ महिन्यात १६० स्वराज ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे.दणगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज ट्रॅक्टने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना भुरळ घातली आहे.हा विक्रमी सेलचा टप्पा




ओलांडण्यासाठी संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांच्या सह स्टेट हेड गुप्ता साहेब, एरिया मॅनेजर गिरीश जाधव, टेरेटरी मॅनेजर चेतन मुंडे साहेब ब्रांच मॅनेजर मुळे साहेब मॅनेजर प्रकाश कदम, मॅनेजर राजू साबळे,अकाउंट प्रांजली उगले,सुजाता सायकड,रेणुका वैद्य, सर्विस मॅनेजर रंजीत मुंडे आप्पासाहेब गायकवाड, सेल्स टीम मध्ये आकाश शेळके, लखन आजबे,सागर निकरड,जालिंदर भवर,गीते, खंडागळे,गायकवाड, सर्विस टीम मध्ये हनुमान घरगणे, आकाश पवार,कृष्णा भवर, इब्राहिम पठाण, रवींद्र खंडागळे, नामदेव हराळ, ओमकार सोले,स्वप्नील बरकडे, ,कुमार विश्वकर्मा आदींच्या अथक परिश्रमाने ग्राहकांना जलद सेवा दिल्याने विक्रमी विक्रीचा टप्पा पार केला आहे. याबद्दल आष्टी तालुक्यातील ग्राहकांचे, शेतकऱ्यांचे, तसेच आष्टी तालुक्यातील मित्र मंडळींचे सावळेश्वर ट्रॅक्टर्स टीमचे सावळेश्वर ट्रॅक्टर्स चे सर्वेसर्वा रमेश दादा आजबे यांनी नुकतेच मनापासून आभार मानले आहेत.

शेतीमध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या आणि बळीराजाचे जिवन समृद्ध करण्याच्या उद्देशाने प्रेरित होऊन आम्ही सुरू केलेल्या आमच्या सावळेश्वर ट्रॅक्टर्स वर ग्राहकांनी प्रचंड विश्वास दाखवला असून सर्वांच्याच सहकार्यामुळे आम्ही ४ महिन्यात १६० ट्रॅक्टर विक्रीचा विक्रमी टप्पा पार केला आहे.आपल्या सर्वांच्याच विश्वासास पात्र राहून ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण करत राहू मी आमच्या ग्राहकांना, शेतकऱ्यांना,आम्हाला दररोज प्रेरणा देणा-या प्रत्येकाला, तसेच आमच्या भागीदारांना आणि आमच्या टीमला आपण सर्वच एकत्र परिवर्तनाच्या प्रवासात करत असताना मनापासून आभार मानू इच्छितो



# शरीरातील व्याधी नष्ट करायच्या असतील तर राम प्रहरी प्राणायाम,ध्यान,योग करावा – आ.सुरेश धस

**प्रतिनिधी @ आष्टी**

आज समाजातील प्रत्येक घटकातील माणूस आपापल्या कामांमध्ये व्यस्त असल्याने त्याचे मानवी शरीराकडे विशेष लक्ष दिसत नाही. त्यामुळे तो विविध व्याधींनी त्रस्त आहे. म्हणून समाजातील या व्याधी नष्ट करायच्या असतील तर राम प्रहरी अत्यंत प्रामाणिकपणे घराघरांत प्राणायाम, ध्यान, योग केल्याने माणसाचे शारीरिक व मानसिक संतुलन सुदृढ होते. आत्मविश्वास व आयुर्मान वाढते, असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.दि. २१ जून रोजी अनिषा ग्लोबल शैक्षणिक संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात आ. धस बोलत होते. योग प्रात्यक्षिक करण्यासाठी नितीन आळकुटे हे होते. पुढे बोलतांना आ. धस म्हणाले, जागतिक स्तरावर योगाचे महत्त्व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पटवून दिले आहे. सध्याच्या काळात धावपळीचे जीवन झाले आहे. जो माणूस काम करतो त्यांना वेळ पुरत नाही. परंतु हे सर्व करतांना आपण आपल्या शरीराकडे लक्ष देणे गरजेचे असून प्रत्येकांनी आपल्यासाठी एक - दोन तास नियमित देणे गरजेचे असल्याचेही आमदार धस यांनी सांगितले. त्यांनी सर्वांना योगासने करून दाखवत त्या योगाचे महत्त्व सांगितले. यावेळी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, माजी नगराध्यक्ष भारत मुरकुटे, संजय शिंगवी, डॉ. चंद्रकांत ढेरे, अॅड. बाळासाहेब मोरे, इंजि. दत्तात्रय देशमुख, सरपंच अशोक मुळे, आत्माराम फुंदे, शहादेव नरवडे, विजय धनवडे, राजाभाऊ निकाळजे, नगर पंचायतचे सभापती शेख शरीफ, अॅड. अविनाश निंबाळकर, किशोर झरेकर, बाबुराव कदम, बाळासाहेब घोडके, दिपक निकाळजे, कपिल अग्रवाल, राजेंद्र लाड यांच्यासह आदि उपस्थित होते. यावेळी योग शिक्षक व प्राणी मित्र नितीन आळकुटे यांचा गौरव आमदार सुरेश धस यांच्याहस्ते करण्यात आला. योग शिक्षक आळकुटे यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले.

# स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून शाळेचा आणि विद्यार्थ्यांचा नावलौकिक करणार – प्राचार्य अशोक डोके

## श्रीकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पालक मेळावा संपन्न

**प्रतिनिधी @ आष्टी**

सध्याचे युग हे संगणकाचे असुन त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाला संगणकाप्रमाणे वागावे लागत असुन समाजात टिकून राहायचे असेल तर मोठी स्पर्धा करावी लागत असून शिक्षण क्षेत्रातही स्पर्धा खुप प्रमाणात वाढली असून ती टिकवून ठेवण्यासाठी मी आणि माझ्या शाळेतील सहशिक्षक प्रामाणिक प्रयत्न करणार असून त्यासाठी योग्य ते नियोजन व पालकांच्या सुचनेचा विचार करून स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून शाळेचा आणि विद्यार्थ्यांचा नावलौकिक करणार असल्याचे मत प्राचार्य अशोक डोके सर यांनी व्यक्त केले.

आष्टी तालुक्यातील मातकुळी येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे श्रीकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शुक्रवार दिनांक २० जून २०२५रोजी सकाळी ११ वाजता विद्यालयाचे प्राचार्य अशोक डोके सर यांच्या मार्गदर्शनाखाली पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाला मातकुळी गावचे सरपंच बबन दादा डोके, कडा कारखान्याचे माजी संचालक सुधाकर डोके, सामाजिक कार्यकर्ते शेषराव आढाव, पत्रकार गहिनीनाथ पाचबैल, वनदेव डोके, सुनिल डोके, विठ्ठल मामा जरे, प्रमोद पाटील, भारत पाचबैल, युवराज डोके, बाळासाहेब डोके, महेंद्र डोके, अभिमान डोके, अशोक जरे, उमेश कोकाटे, धनंजय जरे, गजेंद्र आरेकर, भगवान जरे, गोकुळ डोके, प्रमोद माने, भिमराव खराडे, पै. बालाजी जरे, माजी सरपंच अशोक धोत्रे, बाळासाहेब डोके, दिलीप जरे, सौ. धनश्री समुद्रे, सौ. कविता समुद्रे, सौ. उदमले मॅडम आदी पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाला संबोधीत करताना प्राचार्य अशोक डोके सर म्हणाले की, गेल्या तीन वर्षापासून शाळेचा शंभर टक्के निकाल लागत असून यावर्षी माझा आणि माझ्या सर्व सहशिक्षकांचा एक माणस असून तो म्हणजे यावर्षी शाळेचे अनेक विद्यार्थी हे शंभर पैकी शंभर गुण मिळवून उत्तीर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहणार असून त्यासाठी आम्हाला जी मेहनत घ्यावी लागेल ती आम्ही सर्वजण नियोजन करून करणार असून पालकांनी केलेल्या सूचनेचाही आम्ही विचार करून शाळेच्या प्रगतीचा अहवाल उंचीवर नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार असून शाळेत अनेक प्रकारच्या

खेळाचे प्रशिक्षण दिले जात असुन गेल्या शैक्षणिक वर्षांत खेळाच्या माध्यमातून विभागीय व राज्य पातळीवर विद्यालयाचा नावलौकिक झालेला असुन बीड जिल्ह्यात सर्वाधिक खेळात सहभाग नोंदविला आहे.




यावेळी कार्यक्रमाला सहशिक्षक हजारे सर, एल. एम. डोके सर, दळवी सर, मेरगळ सर, श्रीमती जरे मॅडम, श्रीमती अवसरे मॅडम, श्रीमती काकडे मॅडम, श्रीमती गवसणे मॅडम यांनीही संबोधीत केले व पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये संवाद होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन शाळेचे जेष्ठ शिक्षक विठ्ठल डोके सर व हजारे सर यांनी केले तर आभार श्रीमती अवसरे मॅडम यांनी मानले. सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेले मातकुळी गावचे सुपुत्र ह. भ. प. अशोक डोके सर यांची श्रीकृष्ण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल ग्रामस्थांकडून शाल, फेटा बांधून व पुष्पगुच्छ देऊन भव्य सत्कार करण्यात आला.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजश्री
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )


# श्रीसंत गजानन महाराजांच्या पालखीचे अंबाजोगाईत भक्तीमय वातावरणात स्वागत

## संताच्या जयघोषाने शहर दुमदुमले

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे शनिवारी दुपारी अध्यात्मिक परंपरा लाभलेल्या अंबाजोगाई शहरात आगमन झाले. शहरातील महिला,पुरुष भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.टाळ मृदंगाच्या तालावर शेकडो वारकऱ्यांनी ज्ञानेश्वर माऊली ज्ञानराज माऊली तुकाराम च्या गजरात ठेका धरला. पंढरीनाथ महाराज की जय, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल,संत गजानन महाराज की जय, गण गण गणात बोते या जयघोषात एका पाठोपाठ सुंदर चालीवर भजने म्हटली जातात प्रस्थानाच्या मार्गावर शहरांमध्ये विविध ठिकाणी श्रीसंत गजानन महाराज पालखीचे उत्स्फूर्तपणे स्वागत आणि पूजा करण्यात आली पंढरपूरकडे मार्गक्रमण करणाऱ्या शेगाव येथील श्रीसंत गजानन महाराजांच्यापालखी सोहळ्याला मोठी अध्यात्मिक परंपरा असून या पालखी सोहळ्यात शेगाव येथून अश्व आणि मोठ्या संख्येने वारकरी सहभागी असून यात काही टाळकरी तर काहींच्या हाती भगव्या पताका आहेत. श्रीसंत गजानन महाराज पालखी सोहळा हा अत्यंत शिस्तबद्ध व विशिष्ट पद्धतीने अध्यात्मिक परंपरा जतन करणारा म्हणून ओळखला जातो.



श्री संत गजानन महाराज पालखीचा मुक्काम अंबाजोगाई शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात असून रात्री भजन किर्तन, महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. रविवारी सकाळी श्रीसंत गजानन महाराज यांच्या पालखीचे पंढरपूरसाठी अंबाजोगाई शहरातून प्रस्थान होईल.

यावर्षी प्रथमच जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार गजानन महाराज यांच्या दिंडी समवेत महसुली दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. शासनाच्या वतीने सर्वसामान्य माणसांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध सोयी सवलती व सुविधांची माहिती नागरीकांचा व्हावी यासाठी या महसुल दिंडीचे आयोजन करण्यात आले असल्याचे तहसीलदार विलास तरंगे यांनी सांगितले.



# केजयेथे विविध समस्या साठी नागरिकाचे रास्ता रोको आंदोलन संपन्न

प्रतिनिधी @ केज

झोपडपट्टी हक्क संघर्ष समिती,क्रांती नगर, कानडी रोड,केजच्या विविध प्रश्न व समस्या करिता शुक्रवार दिनांक २० जुन २०२५ रोजी सकाळी ११-००वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.यावेळी बाबुराव गालफाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व लक्ष्मण जाधव भाऊ माजी नगर सेवक,तसेच युवा नेते,योगेश भाऊ गायकवाड ,नागनाथ जावळे,ईरफान पठाण,सय्यद आखिल, बालासाहेब पवार,प्रेम गायकवाड,महादेव लांडगे,अरविंद चाळक, भीमराव हजारे, अच्युतराव मस्के ,गंपू मस्के,समाधान मस्के, रणजित मस्के तसेच क्रांतीनगर येथील सर्व महिला,नागरिक,युवा कार्यकर्ते मोठ्यासंख्येने उपस्थित होते.या रस्ता रोको आंदोलना करीता नगर पंचायत केजचे कर्तव्यदक्ष नगर पंचायत मुख्याधिकारी, तहसील कार्यालयाचे अव्वल कारकून व सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्य्क अभियंता तसेच पोलीस स्टेशन केजचे अहंकारे साहेब व कागदे साहेब यावेळी हजर होते.

# दुष्काळी मराठवाडा पाणीदार होणार कसा ? २६५४ कोल्हापुरी बंधारे गेटविना



प्रतिनिधी @ बीड

दुष्काळी बीडला पाणीदार बनविण्यासाठी जलसंपदा विभागांकडुन १७ सिंचन प्रकल्प प्रकल्प मंजूर करण्यात आले होते.३ वर्षात प्रकल्पाचे काम सुरुच झाले नाही त्यामुळे जलसंपदा विभागाने त्याची प्रशासकीय मान्यता रद्द केली आहे.दुष्काळी बीडला हा मोठा धक्का मानला जात आहे.

मात्र याचवेळी दुसरीकडे मराठवाड्यातील मोठ्या नद्यांवर कोल्हापुरी पद्धतीचे २६५४ बंधारे बांधण्यात आलेले आहेत. परंतुयातील केवळ हिंगोली जिल्ह्यात सर्व बंधा-यांना गेट नसुन उर्वरित जिल्ह्यात पावसात येणारे पाणी गेट अभावी आले तसे वाहून जाते. मराठवाड्यात १९१९१ गेटची आवश्यकता असली तरी याकडे कोणीही लोकप्रतिनिधी अथवा प्रशासकीय अधिकारी गांभीर्याने पाहायला तयार नाही ही वस्तुस्थिति आहे. या बंधाऱ्याच्या गेटच्या दुरूस्तीसाठी ५२ कोटी रूपये निधींची आवश्यकता असुन उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजितदादा पवार यांनी निधीची तरतूद करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

# बर्दापूर महामार्गाचे होणार चौपदरीकरण!

## लोखंडी सावरगाव ते बर्दापूर महामार्गाचे होणार चौपदरीकरण !

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

वार्षिक आराखड्यात समावेश; केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी केली वचनपूर्ती लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा रस्ता चौपदरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्याचेही आदेश अंबाजोगाई शहरा जवळून जाणारा ५४८ बी हा महामार्गावरील बर्दापूर ते लोखंडी सावरगाव या टप्प्याचे चौपदरीकरण करण्याचे आ. नमिता मुंदडा यांच्या प्रचारसभेत दिलेले वचन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पूर्ण केले आहे. केंद्र सरकारच्या वार्षिक आराखड्यात या मार्गाच्या चौपदरीकरणाचा समावेश करण्यात आला आहे.

अंबाजोगाई आणि लातूरला जोडणाऱ्या ५४८ बी या महामार्गावर बर्दापूरच्या पुढे येताच चार पदरी रस्त्याचे अचानक दोन पदरीत रूपांतर होते. या ठिकाणी येणाऱ्या वाहनांच्या गतीचा अचानक अडथळा होत असल्यामुळे याठिकाणी वारंवार गंभीर अपघात घडत आले आहेत. अनेक निष्पाप नागरिकांचे जीव या अपुऱ्या आणि असुरक्षित रस्त्यामुळे गेले आहेत. त्यामुळे या मार्गाचे चौपदरीकरण करण्याची मागणी गेल्या काही



वर्षांपासून सातत्याने केली जात होती.

माजी खासदार प्रीतमताई मुंडे आणि अंबाजोगाईच्या आमदार नमिता मुंदडा यांनी ही नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे वारंवार मागणी केली. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान अंबाजोगाई येथे झालेल्या आ. नमिता मुंदडा प्रचारसभेत गडकरी यांनी या प्रकल्पासाठी सहा महिन्यांत निर्णय घेण्याचे जाहीर आश्वासन दिले होते.

त्यानंतरही आमदार नमिता मुंदडा यांनी विधीमंडळ त्यानंतरही आमदार नमिता मुंदडा यांनी विधीमंडळ अधिवेशनाच्या काळात गडकरी यांची भेट घेऊन पुन्हा एकदा हा मुद्दा सविस्तर मांडला. या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश आले असून रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांनी २०२५-२६ च्या वार्षिक आराखड्यात लोखंडी सावरगाव ते बर्दापूर या महामार्गाच्या १८ किमी लांबीच्या टप्प्याच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतरीत्या केला आहे. या कामासाठी सुमारे २५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

या निर्णयामुळे बर्दापूरच्या पुढे अचानक दोन पदरी होणाऱ्या रस्त्यामुळे निर्माण होणाऱ्या अपघातांची साखळी खंडीत होईल. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना आता सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास अनुभवता येणार आहे. या निर्णयाबद्दल आमदार नमिता मुंदडा यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष आभार मानले असून हा निर्णय प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, या निर्णयाबद्दल नागरिकांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. रस्त्याचे काम नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.मांजरसुंबापर्यंत रस्ता चौपदरीकरणासाठी प्रयत्न सुरू आ. नमिता मुंदडा सध्या दोन पदरी असलेल्या लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या मार्गाचेही चौपदरीकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे आदेश मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याचे आ. मुंदडा यांनी सांगितले.





युवा लोकमित्र चे संपादक व पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष शेख ताहेर यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई च्या वतीने शासकीय विश्रामगृह बीड येथे सत्कार कार्यक्रम घेण्यात आला यावेळी राज्याचे संपर्कप्रमुख वैभव स्वामी, बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान, जिल्हा सचिव शेख वसीम, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा सचिव शेख अब्दुल,महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दीपक काळकुटे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष विनायक जाधव, जिल्हा उपाध्यक्ष शेख अय्युब, बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्याचे अध्यक्ष सचिव व इतर पदाधिकारी उपस्थित होते

# स्थानिक गुन्हे शाखेने गेवराई तालुक्यातील जुगार क्लब वर धाडसी झाडे टाकून केली मोठी कारवाई

प्रतिनिधी @ गेवराई

मौजे गैबीनगर तांडा ता. गेवराई येथे जुगार क्लबवर स्था.गु.शा.बीड ने छापा टाकुन तब्बल ०८ लाख ९२ हजार रुपचेचा मुद्देमाल जप्त करुन सात इसमाविरुध्द केला गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सुचना दिलेल्या आहेत. दिनांक २०/०६/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि महेश विघ्ने हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे चकलंबा हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, मौजे गैबीनगर तांडा ता.गेवराई येथे काही इसम बी.एस.एन.एल टॉवरचे समोरील इसम नामे संभाजी नाटकर यांचे ऊसाचे शेतातील पत्र्याचे शेडचे बाजुला ऊसाचे शेतामध्ये पैश्याची बाजी लावुन हार जीत चा तिर्रट नावाचा जुगार खेळत आहेत. अशी माहीती प्राप्त झाली होती.यावरुन सदर ठिकाणी दोन पंचासमक्ष जावुन छापा टाकला असता सर ठिकाणी आठ इसम गोलाकर रिंगण करुन तिरट खेळताना दिसले.यातील एक इसम पोलीस पार्टीस पाहुन ऊसाचे शेतामध्ये पळुन गेला. उर्वरीत सात इसमांना ताब्यात घेतले.त्यांची नावे १) संभजी नाटकर रा.राक्षसभुवन २) किशोर प्रधान रा.धोंडराई ३) अनिल राठोड रा.ठाकरवाडी तांडा ४) पिकाजी राठोड रा.कुंभेजळगाव ५) संजय शिंदे रा.धोंडराई ६) रविंद्र कोठी रा.गेवराई ७) शेख जावेद रा. रा.राक्षसभुवन असे आहेत.सदर इसमांचे ताब्यातुन चार मोटार सायकल ,एक चार चाकी वाहन व १०८०० रोख रक्कम असा एकुण ०८ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदर सात इसमाविरुध्द पोलीस ठाणे चकलंबा येथे महाराष्ट्र जुगार कायदान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.सदरची कामगिरी मा.श्री. नवनित काँवत पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. शिवाजी बांटेवाड स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने , पोह/ महेश जोगदंड



### गेवराई तालुक्यातील जुगार क्लबवर स्था.गु.शा.बीडने छापा टाकुन तब्बल


# ८ लाख ९२ हजार रुपचेचा मुद्देमाल जप्त करत सात इसमाविरुध्द केला गुन्हा दाखल

प्रतिनिधी @ गेवराई

मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा.बीड यांनी अवैध धंद्याविरुध्द गोपनिय माहिती काढुन कारवाई करण्यासाठी स्थागुशा पथकांना सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक २०/०६/२०२५ रोजी स्थागुशा बीड येथील पोउपनि महेश विघ्ने हे वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे चकलंबा हद्दीमध्ये अवैध धंद्याची माहिती काढत असतांना गुप्त बातमी मिळाली की, मौजे गैबीनगर तांडा ता.गेवराई येथे काही इसम बी.एस.एन.एल टॉवरचे समोरील इसम नामे संभाजी नाटकर यांचे ऊसाचे शेतातील पत्र्याचे शेडचे बाजुला ऊसाचे शेतामध्ये पैश्याची बाजी लावुन हार जीत चा तिर्रट नावाचा जुगार खेळत आहेत. अशी माहीती प्राप्त झाली होती.यावरुन सदर ठिकाणी दोन पंचासमक्ष जावुन छापा टाकला असता सर ठिकाणी आठ इसम गोलाकर रिंगण करुन तिरट खेळताना दिसले.यातील एक इसम पोलीस पार्टीस पाहुन ऊसाचे शेतामध्ये पळुन गेला. उर्वरीत सात इसमांना ताब्यात घेतले.त्यांची नावे १) संभजी नाटकर रा.राक्षसभुवन २) किशोर प्रधान रा.धोंडराई ३) अनिल राठोड रा.ठाकरवाडी तांडा ४) पिकाजी राठोड रा.कुंभेजळगाव ५) संजय शिंदे रा.धोंडराई ६) रविंद्र कोठी रा.गेवराई ७) शेख जावेद रा. रा.राक्षसभुवन असे आहेत.सदर इसमांचे ताब्यातुन चार मोटार सायकल ,एक चार चाकी वाहन व १०८०० रोख रक्कम असा एकुण ०८ लाख ९२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.सदर सात इसमाविरुध्द पोलीस ठाणे चकलंबा येथे महाराष्ट्र जुगार कायदान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. नवनित काँवत पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. शिवाजी बांटेवाड स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने , पोह/ महेश जोगदंड, राजु पठाण, राहुल शिंदे, पो शि/बप्पासाहेब घोडके, चालक गणेश मराडे यांनी मिळुन केलेली आहे.



हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# ई फेरफार १५ दिवसात मंजुर करा जिल्हाधिकारी जॉन्सन यांचे आदेश

**प्रतिनिधी @ पाटोदा**

तालुक्यातील कुसळंब येथे दि.२० जुन रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड यांच्या हस्ते करण्यात आले व पाटोदा तहसील येथे आढावा बैठक घेण्यात आली यावेळी बोलताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की तलाठ्यांनी सजावर रहावे ई फेरफार १५ दिवसात मंजुर करा तसेच महाराजस्व शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी बीड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी महसूल विभागाअंतर्गत सं.गां.यो. आपले सरकार केंद्र, महिला बचत गट इत्यादी वेगवेगळ्या कक्ष उभारण्यात आले होते. या कक्षास जिल्हाधिकारी यांनी भेट देवून कक्षाची चौकशी केली व उपस्थितांना मार्गदर्शन केले. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर मध्ये सं.गां.यो. लाभार्थी यांचे पात्र आदेश, शेतकरी आत्महत्या ग्रस्त वारसास मंजुरी आदेश देण्यात आले, नवीन पात्र मतदारास. भारत निवडणूक आयोग यांचे ओळखपत्र वाटप करण्यात आले, ऑनलाइन रेशन कार्ड लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले, भटके जाती जमातीच्या



लाभार्थी यांना जातीचे प्रमाणपत्र, धरणग्रस्त प्रमाणपत्र, पात्र लाभार्थी यांना घरकुल प्रमाणपत्र देण्यात आले, गरोदर महिला यांना बेबी कीट चे वाटप केले. त्यानंतर जरेवाडी येथील प्राथमिक शाळा जिल्हा परिषद येथील शाळेला भेट देवून संबंधीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच किचन शेड, प्रयोग शाळा, रॉबीटीस्कची पाहणी केली. तसेच तहसील कार्यालय पाटोदा येथे सर्व ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी व कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांची जिल्हाधिकारी यांनी विविध विषयावर महसूल आढावा बैठक घेण्यात आली. बोलताना म्हणाले की ई फेरफार ऍग्री स्टॅक वसुली याबाबत सूचना दिल्या त्याचप्रमाणे संबंधित गावच्या तलाठ्याने सध्या सजावर राहावे नैसर्गिक आपत्ती बाबत कडक सूचना दिली असून फेरफार १५ दिवसाच्या आत मंजूर करा त्याचप्रमाणे पाटोदा तालुक्यात असणारे पानंद रस्ते हे खुले करून देण्यासाठी तात्काळ कारवाई करावी तसेच अँग्री स्टॅक यांबाबत

ई फेरफार ऍग्री स्टॅक वसुली याबाबत सूचना दिल्या त्याचप्रमाणे संबंधित गावच्या तलाठ्याने सजावर राहावे नैसर्गिक आपत्ती बाबत कडक सूचना दिली असून फेरफार १५ दिवसाच्या आत मंजूर करा त्याचप्रमाणे पाटोदा तालुक्यात असणारे पानंद रस्ते हे खुले करून देण्यासाठी तात्काळ कारवाई करावी तसेच अँग्री स्टैंक यांबाबत सूचना देऊन मंडळ निहाय शिबिर आयोजित करावेत व तलाठ्याने गाव सोडू नये असे स्पष्ट सूचना देऊन मंडळी निहाय शिबिर आयोजित करावेत व तसेच उपस्थित नागरिकांना शासकीय योजनांचा अधिकाधिक लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांच्या सोबत अपर जिल्हाधिकारी बीड. हरिष धार्मिक. उपविभागीय अधिकारी . वसिमा शेख व तहसिलदार पाटोदा. दत्तात्रय निलावाड हे उपस्थित होते. तसेच, तहसिल कार्यालय पाटोदा चे नायब तहसीलदार महसूल-२ बाळदत्त मोरे, निवासी नायब तहसीलदार. अभय जोशी, नायब तहसिलदार, सं.गा.यो.गणेश दहिफळे व अव्वल कारकून महसूल प्र. नायब तहसिलदार पुरवठा. श्रीनिवास मुळे, सह विविध विभाग प्रमुख, गट विकास अधिकारी, पंचायत समिती पाटोदा, मुख्याधिकारी नगरपंचायत पाटोदा, तालुका कृषी अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, सहाय्यक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, उपअधिक्षक भुमि अभिलेख, सामाजीक वनीकरण अधिकारी उपविभाग केज, पोलीस निरीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक हे उपस्थित होते



## चि.आरव अशोक म्हेत्रे यांची जवाहर नवोदय विद्यालय गढी येथे निवड

**प्रतिनिधी @ वडवणी**

जिल्हा परिषद प्राथमिक विद्यालय कवडगाव येथील विध्यार्थी चि.आरव अशोक म्हेत्रे यांनी नवोदय परिक्षेत ९२.५.गुण घेऊन घवघवीत यश प्राप्त करून जवाहर नवोदय गढी विद्यालय येथे निवड झाली आहे.करीता शाळेचे शिक्षक श्री प्रफुल्ल टकले सर , शाळेचे मुख्याध्यापक श्री बडे सर, व स्टेप बाय स्टेप च्या संचालिका श्रीमती रोकडे मॅडम यांनी मार्गदर्शन केले.यशाबद्दल.आरव चे सर्व स्तरातून शुभेच्छा चा उर्शाव होत आहे .शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक उज्वल भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



## महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वडवणी चे अधिकारी मा.अजितजी पाटील सर यांची सातारा येथे बदली झाली

**प्रतिनिधी @ वडवणी**

आज दिनांक २१/०६/२०२५ शनिवार रोजी महाराष्ट्र ग्रामीण बँक वडवणी शाखेतर्फे आज त्यांना निरोप देण्यासाठी छोटेखानी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.मा.पाटीलसर शाखेत रुजु झाल्यापासुन ते आजपर्यंत त्यांची कारकीर्द उत्कृष्ट राहिली आपले कर्तव्य निभावताना त्यांनी ग्राहकवर्गासह शाखेतील सर्व अधिकारी पदाधिकारी यांची मने जिंकली एक शांत संयमी तसेच कार्ये तत्परतेने त्यांनी आपला आठवणींचा ठसा कायम ठेवला असुन त्यांची बदली झाल्याने शाखेत त्यांची वेळोवेळी उणीव भासणार आहे परंतु बदली तर होणारच असते असे अधिकारी शाखेत लाभतील कि नाही हे भविष्य काळच सांगू शकेल असे भावनिक मत शाखा व्यवस्थापक मा.परमेश्वर मायकरसर यांनी व्यक्त केले याप्रसंगी शाखेतील अधिकारी मा.प्रणय पाटील सर जाधव मॅडम वाकळे मॅडम कर्मचारी गोरख पंधारे बँक मित्र सर्वश्री शांतिनाथ जैन पुरूषोत्तम गिलबिले महादेव सरक आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे बहारदार सुत्र संचालन विशाल दादा कसबे यांनी केले या कार्यक्रमात मा.अजितजी पाटील यांना शाखेतर्फे श्रीगणेशाची मुर्ती भेट देण्यात आली.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गोरख पंधारे यांनी केले.



## योग केल्याने शरीराला ऊर्जा मिळते - प्रा. डॉ.अशोक नागरगोजे श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात योग दिन मोठ्या उत्साहात साजरा

**प्रतिनिधी @ बीड**

शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी दररोज सकाळी योगासन करावे असे आवाहन प्रा. डॉ. अशोक नागरगोजे यांनी श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री. दत्तात्रय चव्हाण सर हे होते. तर व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते तथा योग शिक्षक डॉ. संजय तांदळे, आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम आदी उपस्थित होते.योग दिनाच्या निमित्ताने प्रा. डॉ.अशोक नागरगोजे आणि ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे प्रात्यक्षिक करून दाखवले शिवाय योग दिना बद्दल सखोल मार्गदर्शन केले.यावेळी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी योग करून योग दिन साजरा केला.

## यौग हा प्रत्यैकाच्या शरीरासाठी अत्यावश्यक डॉ. दत्ता नलावडे

### २१आंतरराष्ट्रीय योगा दिन उत्साह संपन्न

**प्रतिनिधी @ बीड**

मेरा युवा भारत बीड, राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य जिल्हा शाखा बीड यांच्या संयुक्त विद्यमाने संस्कृती विद्यालय बीड या ठिकाणी अकराव्या जागतिक योगा दिनाच्या आयोजन करण्यात आले होते. यावेळी योग प्रशिक्षण म्हणून डॉ दत्ता नलावडे तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रमोद जव्हेरी,वैजनाथ खोडवे,निलेश थोरात,तत्त्वशील कांबळे उपस्थित होते सर्वप्रथम नलावडे यांनी योग दिनाचे महत्त्व सांगितले तसेच वर्षाचे ३६५ दिवस रोज सकाळी उठून योगा करणे आपल्या शरीरासाठी खूप अत्यावश्यक आहे. त्यामुळे आपले शरीर मन निरोगी राहते कोणताही रोग आपलं जवळ भटकत नाही त्यामुळे प्रत्येकाने



दररोज कमीत कमी ४० मिनिटे व जास्तीत जास्त एक तास आपल्या शरीरासाठी देणे आवश्यक आहे असे प्रतिपादन यावेळी दाता नलावडे यांनी केले त्यानंतर उपस्थित ४०० विद्यार्थ्यांना योग प्रात्यक्षिक करून दाखवले. यावेळी तत्त्वशील कांबळे यांनी जमलेल्या युवकांना योग दिनानिमित्त व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली व्यसनापासून दूर राहून आपले शरीर व मन सुदृढ करायचे असेल तर योग हा सर्वोत्तम पर्याय आहे असे मनोगत तत्व शील कांबळे यांनी व्यक्त केले.

## सेवानिवृत्त सैनिक विलास चक्रे व पंडित चक्रे यांचा महामानव अभिवादन ग्रुप बीड च्या वतीने सत्कार संपन्न

**प्रतिनिधी @ बीड**

अभिवादन ग्रुपच्या कार्यालयामध्ये सेवानिवृत्त सैनिक विलास चक्रे व पंडित चक्रे यांचा सत्कार करण्यात आला. देशसेवा करून आल्या नंतर पोलीस प्रशासनामध्ये भरती होऊन पुन्हा एकदा जनतेची सेवा करण्यासाठी विलास चक्रे हे पोलीस भरती झाल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर सेवानिवृत्त सैनिक पंडित चक्रे यांच्या मुलास दुबई येथील आय आय टी कंपनी मध्ये नोकरी लागल्यामुळे त्यांचाही सत्कार करण्यात आला.महामानव अभिवादन ग्रुप बीडच्या वतीने शहरांमध्ये दोन ठिकाणी मोफत शिकवणी वर्ग (ट्युशन) चालू आहेत. त्याच्या प्रचंड प्रतिसादामुळे व विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या प्रगतीला पाहून



आणखी एक नवीन मोफत शिकवणी वर्ग सुरू करण्याचा संकल्प महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने करण्यात आला. हे शिकवणी वर्ग पूर्णपणे जागृत समाज बांधवांच्या वतीने आर्थिक वर्गणी करून चालविण्यात येतात. त्याचप्रमाणे शिकवणी वर्गामधील मुला-मुलींना शालेय साहित्य देखील मोफत देण्यात येते अशा या लोकोपयोगी उपक्रमामुळे जिल्ह्यातच नव्हे तर जिल्ह्याच्या बाहेर देखील या उपक्रमाची स्तुती होत आहे म्हणून आता तिसरा मोफत शिकवणी वर्ग सुरू करण्याचा संकल्प महामानव अभिवादन ग्रुप ने केला आहे. या ग्रुपमध्ये आपण देखील आपलं आर्थिक योगदान देऊ शकत असाल तर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष माननीय गुलाब भोले त्याचबरोबर वाचाल तर वाचाल मोफत फिरते वाचनालय चे डी.जी. वानखेडे, अशोक गायकवाड,राजभाऊ आठवले यांच्याशी संपर्क करून तन-मन-धनाने सहभागी व्हावे असे आवाहन महामानव अभिवादन ग्रुप च्या सर्व सभासदाकडून करण्यात येत आहे. याचवेळी सत्कार समारंभ उपस्थित ०६ जणांनी दरमहा नियमित दान देण्याचे जाहिरात करून या महिण्याचे दान दिले.सत्कार समारंभाचे अध्यक्ष डि.जी.वानखेडे होते जि. एम भोले यांनी प्रस्ताविक केले,तर,सुत्रसंचलन डी.एम. राऊत यांनी केले तर आभार प्रदर्शन कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी केले.या कार्यक्रमाला काशिनाथ वाघमारे,से.नि.पो.उप.नि.तानाजी शिनगारे,बी.डी.तांगडे.एस.एस.सोनवणे,व प्रशांत वासनिक यांच्या सह बहुसंख्ये सदस्य उपस्थित होते.



## एमआयआयटी महाविद्यालयामध्ये जागतिक योग दिन साजरा

**प्रतिनिधी @ बीड**

एमआयआयटी महाविद्यालया बीड येथे जागतिक योग दिनानिमित्त योग दिवस साजरा करण्यात आला. यावेळी आर्ट ऑफ लिविंग संस्थेचे योग प्रशिक्षक प्रा. मयुरेश गावरस्कर यांनी योग दिनानिमित्त योगाचे जीवनातील महत्व याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी कॉलेजचे प्राचार्य जोजो सर, उपप्राचार्य शेख साबेर सर, प्रा.संजीवनी पवार मॅडम, मुकेश ससाणे, सुनीता सदाफुले आदी उपस्थित होते.

## ग्लोबल प्री प्राइमरी आणि शांतिनिकेतन इंग्लिश स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**प्रतिनिधी @ बीड**

जागतिक स्तरावर २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. याप्रसंगी ग्लोबल प्री प्राइमरी आणि शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल,पांगरी रोड,बीड या इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये योग प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक तथा प्रमुख अतिथी म्हणून बीड शहरातील लोकप्रिय डॉ.सुदाम मोगले सर, मानस उपचार तज्ञ तसेच डॉ.कैलास पैठणकर सर, प्रसिद्ध सर्जन हे मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी शाळेचे प्राचार्य श्री.अनिल जोशी सर यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या आरंभी शाळेतील शिक्षक संतोष परदेशी सर यांनी प्रास्ताविक केले.

प्रमुख अतिथी म्हणून विद्यार्थ्यांना डॉ. सुदाम मोगले सर,डॉ.कैलास पैठणकर सर यांनी योगा विषयी विस्तृत मार्गदर्शन केले.याप्रसंगी मान्यवरांनी विविध आसनांच सादरीकरण केलं. विद्यार्थ्यांनी या प्रात्यक्षिकाचा मनमुराद आनंद घेताना योगाचा आपल्या जीवनात नित्य उपयोग करण्याचा मानस व्यक्त केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन



शाळेतील शिक्षिका सौ.राजश्री गवते मॅडम आणि सौ.अश्विनी ढोरमारे मॅडम यांनी केले. तसेच या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेतील शिक्षिका सौ.रोमिलीना रेड्डी यांनी केले. शाळेतील योग शिक्षक श्री.महेश वैद्य सर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी शिक्षण संस्थेच्या वतीने श्री.बी.बी.जाधव सर ( सनदी लेखापाल ), प्रा.मदनरावची जाधव सर, श्री.संजयजी पवार सर,सौ.वैशालीताई जाधव मॅडम, शाळेचे प्राचार्य श्री.अनिल जोशी सर यांनी सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या.




**प्रतिनिधी @ बीड**

आषाढी वारी निम्मित श्री क्षेत्र मुक्ताईनगरहून पंढरपूर कडे मार्गस्थ असणाऱ्या संत मुक्ताबाईच्या पालखीचे आगमन आज बीड शहरात झाले. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी पालखीचे स्वागत करून संस्थानचे विलास महाराज खोले यांच्या सह वारकऱ्यांचे आदरातिथ्य केले. यावेळी शिवसेनेचे सुशील पिंगळे, नवनाथ प्रभाळे, गणेश लोणकर, रंगनाथ पैठणकर, बाळु वैद्य सह आदी.

# अंबड येथील छत्रपती योग व क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर योग शिबिर घेऊन आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**प्रतिनिधी @ अंबड**

दि.२१ जून शनिवार रोजी नगर परिषदेच्या छत्रपती योग व क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर पहाटे ५:३० ते ७:१५ पर्यंत योग शिबिर घेऊन नियमित योग साधकांच्या मदतीने आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी नियमित योग साधनेचा धडा देणारे श्री घनश्याम शिंदे यांनी विवेचन करुन प्रत्यक्षिके द्वारे सुंदर योग सत्र घेतले याप्रसंगी नगर परिषदेच्या पल्लवी देशपांडे मॅडम,श्री सांगळे, स्वामी समर्थ मंदिर येथे नियमित योग वर्गातील जेष्ठ योग साधक डॉ.कल्याण जोशी, ड.भागवत लहाने,श्री चिंताम्बर मेटकर,श्री भाऊसाहेब आंधळे, डॉ.वाय.बी.कुलकर्णी ,श्री राजेंद्र देशमुख,श्री प्रदीप लुखे,श्री नारायण तिकांडे,श्री सीताराम वाघ यांनी योग साधनेचा लाभ घेऊन योग दिनाच्या सर्व योग साधकांना शुभेच्छा दिल्या यावेळी खुल्या मैदानात छत्रपती योग व क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर योग साधकांनी उपस्थितीत राहुन आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने योगाचा लाभ घेतला असून श्री देवा चित्राल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करुन सर्व योग साधकांचे आभार व्यक्त केले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संदर्भात आम आदमी पार्टी ची म्हत्वाची बैठक – जिल्हाध्यक्ष अशोक येडे

**प्रतिनिधी @ बीड**

महाराष्ट्रा मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका लवकरच होणार आहे या अनुषंगाने महाराष्ट्राचे प्रभारी मा. प्रकाशजी जारवाल व महाराष्ट्राचे कार्यकारी अध्यक्ष माननीय अजितजी फाटके यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथे महाराष्ट्रातील सर्व जिल्हाध्यक्ष राज्य कमिटी यांच्या उपस्थितीमध्ये बैठक संपन्न झाली.



या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला की महाराष्ट्रामध्ये आम आदमी पार्टी स्वातंत्र स्वबळावर स्थानिक स्वराज्य निवडणुका लढणार आहे या अनुषंगाने आम आदमी पार्टीची महत्वपूर्ण बैठक दिनांक २२ /०६/ २०२५ रविवार रोजी सकाळी ११.०० वाजता. हॉटेल बालाजी, पांगरी रोड सम्राट चौक शाहूनगर बीड, येथे आयोजित करण्यात आली आहे तरी बीड तालुक्यातील व शहरातील सर्व कार्यकर्ते पदाधिकारी यांनी बैठकीस उपस्थित राहणे अनिवार्य आहे पुणे येथे झालेल्या प्रभारींच्या बैठकीमधील निर्णय व येणाऱ्या निवडणुका संदर्भात आढावा घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे असे आव्हान माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी यांनी केले आहे.



**प्रतिनिधी @ जाफ्राबाद**

देऊळझरीत येथील जिल्हा परिषद शाळेत आज शनिवार दि. २१ ला आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी शालेय समिती अध्यक्ष श्रीरंग साळवे, केंद्रीय मुख्याध्यापक अवकाळे सर ,भुतेकर सर, पाटेकर सर ,तुपकर सर, मोरे सर ,वाघमारे सर , धोंडगे सर व बकाल सर उपस्थितीत होते.यावेळी योगविषयीचे महत्त्व विशद करण्यात आले.



**प्रतिनिधी @ अंबड**

अंबड तालुक्यातील पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला शहागड येथील शाळेत जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.योग प्रशिक्षक संभाजी लंगोटे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी मुख्याध्यापक वाहुळे सी आर,शिक्षक भारत खेडकर,पानसरे, कांबळे, श्रीमती जोशी, सोलनकर,मनोहर, वाघमारे, दरगुडे,नरसाळे,शिंदे, तांबोळी,कोरे,निर्मळ,सावंत व विद्यार्थी, विद्यार्थीनीची उपस्थिती होती.

## शैक्षणिक साहित्य किट ११ तर ५८ विद्यार्थ्यांना वही पेनचे, ४५ पुस्तकाचा संच मान्यवरांच्या हस्ते वाटप

# महामानव अभिवादन ग्रुपच्या मोफत शिकवणी वर्गातील गुणवंताचा गौरव

**प्रतिनिधी @ बीड**

महामानव अभिवादन ग्रुप बीड शहरात व परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे. महामानव अभिवादन ग्रुप चे दानदाते प्रा. डॉ. नामदेव शिनगारे व त्यांची मुलगी आनंदी शिनगारे यांच्या वाढदिवसाच्या अभिष्टचिंतना निमित्त; महामानव अभिवादन ग्रुप संचलित प्रकाश आंबेडकर नगर येथील मोफत शिकवणी वर्गातील वैष्णवी चौगुले, आकांक्षा वाघमारे, अमृत चौगुले, नायरा कुराडे,प्रीतम रोकडे,अनन्या वाघमारे, राजरत्न विद्यागर, समृद्धी बचुटे, श्रद्धा रोकडे, तंजीला शेख या ११ गुणवंत विद्यार्थ्यांना एक वर्ष पुरेल एवढ्या शैक्षणिक साहित्याची किट व पुष्पगुछ मान्यवारांच्या हस्ते देऊन सत्कार करण्यात आला तर ५८ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते वही पेनचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षपदी ड के. आर. गाडे हे होते तर विचारमंचा वर महामानव अभिवादन ग्रुप चे अध्यक्ष जि. एम.भोले, वाचाल तर वाचाल फिरते माफत वाचनालायचे संस्थापक डी. जी. वानखेडे, से. नी. जिल्हा प्रबंधक एलआयसी वाघमारे यु.एस,समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले, बसपा जिल्हाध्यक्ष प्रशांत वासनिक, ड तेजस वडमारे, एस. एस. सोनावणे,बी. डी. तांगडे, काशिनाथ वाघमारे, व प्राध्यापक डॉ. नामदेव शिनगारे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. एम.राऊत यांनी केले तर प्रास्ताविक प्रशांत वासनिक यांनी करून उपस्थित विद्यार्थ्यांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याबद्दल माहिती देऊन त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन अभ्यास करावा असे आवाहन केले. प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनीही सामाजिक व शैक्षणिक विचार व्यक्त करून अनिष्ठरूढी व अंधश्रद्धेच्या आहारी न जाता वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून आपल्या जीवनाची वाटचाल ठेवावी हे अनेक उदाहरणाद्वारे अत्यंत सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना लहानपणीच वाचनाची गोडी लागावी म्हणून सुरू करण्यात आलेल्या वाचाल तर वाचाल या फिरत्या मोफत वाचनालयाचे पहिले केंद्र असलेले प्रकाश आंबेडकर नगर केंद्राकरिता ४५



पुस्तकांचा संच वितरित करण्याकरिता मान्यवरांच्या हस्ते शिकवणी वर्गाच्या शिक्षिका विशाखा वाघमारे यांना सुपूर्त केला. वितरित केलेल्या पुस्तकावर आधारित १५ ऑगस्ट पूर्वी विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन स्वातंत्र्यदिनी प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास प्राध्यापक डॉ.नामदेव शिंगारे यांच्यातर्फे १००० रुपये बक्षीस तर दुसरा क्रमांक मिळवणाऱ्या ५०० रुपये बक्षीस वाचाल तर वाचाल तर्फे, तर तिसरा क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास आयु. यु एस वाघमारे तर्फे ४०० रुपये बक्षीस तसे पाच विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षीस प्रशांत वासनिक यांनी जाहीर केले तरी या पुस्तकाचा जास्तीत जास्त वाचनाचा फायदा घ्यावा असे आवाहन डी.जी. वानखेडे यांनी केले.

अध्यक्षीय समारोप ड के. आर गाडे यांनी केला तर आभार प्रदर्शन डॉ.जगदीश वाघमारे यांनी व्यक्त केले या कार्यक्रमास प्रकाश आंबेडकर नगरातील नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून सरनातंय ने कार्यक्रमाची सांगता झाली.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन संपन्न

**प्रतिनिधी @ धारूर**

**येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २१ जून रोजी जागतिक योग दिनानिमित्त महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. बालाजी नवले यांनी योगाचे विविध प्रकार व महत्त्व हे प्रात्यक्षिकाद्वारे समजावून दिले. नियमित योगासने केल्याने शारीरिक तंदुरुस्ती व आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. स्नायूंचे विविध आजारांवर मात करता येते असे सांगितले.**



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोगी शरीरासाठी योग साधना कशी उपयुक्त ठरू शकते हे सांगून सर्वांनी योग नियमितपणे करावा असे उपस्थितांना आवाहन केले. आयोजित कार्यक्रमांमध्ये उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, प्रा. सच्चिदानंद ढेपे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. वायाळ सर, धारुर तालुक्याचे क्रीडा संयोजक तथा आदर्श क्रीडा शिक्षक लहू कुमार गव्हाणे यांबरोबरच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, एनसीसी कॅडेट्स, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थ्यांचे उपस्थिती मोठ्या संख्येने होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले.

# पाऊले चालती पंढरीची वाट

## श्री क्षेत्र गहिनीनाथगडाचा पालखी सोहळा २५ तारखेला पंढरपूर कडे होणार प्रस्थान

**प्रतिनिधी @ मानुर**

गेल्या अनेक वर्षांपासून अविरत सुरू असलेला श्री संत वामनभाऊ महाराज यांनी सुरू केलेला हा पालखी सोहळा श्री क्षेत्र गहिनीनाथगड ते पंढरपूर येत्या २५ तारखेला प्रस्थान होणार असून या मध्ये हजारो भाविकांनी सोहळ्याचा लाभ घ्यावा असे गडाचे महंत श्री विठ्ठल महाराज यांनी म्हटले आहे, या पालखी सोहळ्याचे नियोजन गहिनीनाथ गड चे महंत श्री विठ्ठल महाराज यांनी केले आहे . नाथांचा व गुरुपरंपराचा अभिषेक करून या पालखीची सुरुवात होणार आहे हा पालखी सोहळा दहा दिवसाचा आहे . यंदाची वारी ही मोठ्या उत्साहात सुरू होणार आहे असे पाहायला मिळत आहे . श्री क्षेत्र गहिनीनाथगड च्या वतीने आषाढी वारी करत वारकरी दर वर्षी पंढरपूर ला जात असतात वारी जात असताना या मध्ये वैराग्यमूर्ती श्री संत श्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांच्या विचाराचा ऐतिहासिक परंपरा वारसा गडाकडून जपला जातो.या पालखी सोहळ्याचे आकर्षण सजावटीचा रथ,घोडा वारकरी ,गायनचर्य,मृदुगाचार्य टाळकरी याच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडणार आहे.२५ जून रोजी गहिनीनाथ गड येथून पंढरपूर कडे प्रस्थान होत असताना या मध्ये १० मुक्काम होणार आहेत हा पालखी



सोहळा ४ जुलै रोजी पंढरपूर मध्ये मुक्कामी जाणार आहे .हा पालखी सोहळा पंढरपूर कडे जात असताना गावा गावा मध्ये पालखी चे पूजन केले जाते त्याच प्रमाणे येणाऱ्या वारकऱ्यांची पाहुणचारची सोय त्या ठिकाणी केली जाते .हा पालखी सोहळा विठ्ठल नामाच्या जय घोषात श्री क्षेत्र गहिनीनाथगड ते निवडुंग ,मातकुळी मैदान, सारोळा,पिंपळगाव उंडा,तांदळवाडी , मिरगवन, वरकुटे मूर्तीचे, भोगेवाडी, आरण , श्री क्षेत्र पंढरपूर मुक्काम असा १० दिवसाचा प्रवास करत वारकरी जाणार आहे.असे श्री क्षेत्र गहिनीनाथगड च्या वतीने सांगण्यात आले आहे.

# चाईल्ड प्रायमरी स्कूल मध्ये जागतिक योगदिन उत्साहात साजरा

**प्रतिनिधी @ केज**

चाईल्ड प्रायमरी स्कूल मध्ये शनिवार दि.२१ जुन रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.शाळे तील शिक्षक,विद्यार्थी आणि पालक यांच्या उपस्थितीत विविध योग क्रियांच्या माध्यमातून शरीर आणि मनाच्या आरोग्याचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी मार्गदर्शक शिक्षकांच्या नेतृत्वा खाली ताडासन, वृक्षासन,भुजंगासन, प्राणायाम,अनुलोम-विलोम,कपालभाती यांसारखी विविध योगासने सादर केली. लहान मुलांनीही उत्साहाने सहभागी होत योग्य पद्धतीने आसने केली,ज्यामुळे



उपस्थित सर्वांना प्रेरणा मिळाली.मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे आभार मानत सांगितले की,अशा उपक्रमांमुळे विद्यार्थी लहान वयातच आरोग्या विषयी जागरूक होतात आणि हीच खरी शाळेची गरज आहे.

# राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत जागतिक योग दिन साजरा

**प्रतिनिधी @ केज**

दिनांक २१ जून २०२५ रोजी जागतिक योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्यासाठी योगाचे महत्व समजावून देण्या साठी स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज च्या राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत योगाभ्यास घेण्यात आला.यावेळी शाळेच्यामुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी. यांची प्रमुख उपस्थिती होती तर मार्गदर्शक म्हणून शाळेचे माजी शिक्षक श्री.एस.ए. डापकर यांची उपस्थिती होती.यावेळी एस.ए. डापकर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाले की,योगामुळे आपण



निरोगी व दीर्घायुष्य जगू शकतो. आपल्या शरीर व मनाचे आरोग्य चांगले ठेवण्या साठी योग करणे खूप गरजेचे आहे.त्यामुळेच सर्व जगभर योगाचे महत्व अधोरेखित होत आहे.यावेळी विविध योगासने करण्यात आली.यावेळी विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

# स्वानंद सार्वजानिक वाचनालयात आंतर राष्ट्रीय योगदिन योग प्रात्यक्षिक व योग पुस्तक वाचन व मार्गदर्शनाने संपन्न

**प्रतिनिधी @ केज**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक २१ जुन २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन योग प्रात्यक्षिक, योग ग्रंथवाचन व मार्गदर्शन कार्यक्रम घेवून साजरा करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालया चे सहसचिव ज्ञानोबा भोगजकर हे होते.तर योगाचे प्रात्यक्षिक दादासाहेब गायकवाड यांनी करून दाखविले व योगाचे आरोग्य विषयक फायदेही विषद केले.योगाचे महत्व, गरज हे आपल्या प्रात्यक्षिकातून व मार्ग दर्शनातून सांगीतले.

योग विषयक माहिती असलेल्या सा.सकाळ चे वाचन स्वप्नील राम राजे गायकवाड व विठ्ठल बाबासाहेब शिंदे यांनी केले.यावेळी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ समाज सेवक,जेष्ठ विचारवंत, ख्यातनाम वक्ते,परखड व्याख्याते प्राचार्य डॉ. वसुदेवबप्पा गायकवाड रावसाहेब जाधव यांनी ही योग विषयक मनोगत व्यक्त केले.तसेच रामराजे गायकवाड,प्रदिप गायकवाड,अरुण गायकवाड,तुकाराम



गायकवाड,बाळासाहेब गायकवाड,संजय सोनवणे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमात वाचक, युवक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.